MHPU170007232022

दाखल तारीख : ०६/०४/२०२२
नोंदणी तारीख : १८/०४/२०२२
निकाल तारीख : १७/०७/२०२६
कालावधी : ०४ व. ०३ म. ११ दि.

# न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, इंदापूर, जि. पुणे यांचे न्यायालय

(पिठासीन अधिकारी एम. एच. फारुकी)

**सं.फौ ख. क्र.२०२/२०२२** **निशाणी क्र.०८ लगत**

| | |
|---|---|
| **महाराष्ट्र सरकार द्वारा**<br>इंदापूर पोलिस स्टेशन, इंदापूर<br>ता. इंदापूर, जि. पुणे. | **.... अभियोग पक्ष** |
| **—विरुध्द—** | |
| **शामराव बापूराव दगडे**<br>वय : २३ वर्ष, व्यवसाय : ड्रायव्हर<br>रा. वरकुटे खुर्द, ता. इंदापूर, जि. पुणे. | **.... आरोपी** |

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०५/०७/२०१६ |
| पहिली खबर तारीख | ०५/०७/२०१६ |
| दोषारोपपत्राची तारीख | २९/११/२०१८ |
| विवरणपत्र ठेवल्याची तारीख | ०१/०३/२०२५ |
| पुराव्याला लागल्याची तारीख | ०८/०४/२०२५ |
| न्यायनिर्णयास राखीव तारीख | -------- |
| न्यायनिर्णयाची तारीख | १७/०७/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -------- |

**आरोपीची माहिती**

| आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हयाचे कलम | शिक्षेस पात्र किंवा निर्दोष | शिक्षाधिन बंदीचा कालावधी UTP |
|---|---|---|---|---|---|
| शामराव बापूराव दगडे | १८/०७/१६ | १८/०७/१६ | भा.दं.वि. कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८ व ४२७ व तसेच मो. वा. अधि. कलम १८४ , १३४/१७७ अन्वये. | निर्दोष | -- |

## सरकारी साक्षीदारांची यादी

| अनु.क्र. | नाव | नि.क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | दिपक शिवाजी शिंदे | ०८ | फिर्यादी |
| २. | अनिल सोपान जगताप | ०८ | साक्षीदार |
| ३. | छायाबाई बाळासाहेब चव्हाण | ०८ | साक्षीदार |
| ४. | अतुल बाळासाहेब चव्हाण | ०८ | साक्षीदार |

## अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १७ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | १८ व १९ | वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ३. | २० | शवविच्छेदन अहवाल |

## बचाव पक्षाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्यायालयाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | ०८ | दोषारोप |
| २. | ०८ | आरोपीचे निवेदन |

**भौतीक वस्तू**

| अनु.क्र. | साहित्य नंबर | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**आरोप:- भारतीय दंड विधानाचे कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८ व ४२७ तसेच मोटार वाहन अधिनियमाचे कलम १८४ , १३४/१७७ अन्वये.**

सुविद्य सहा. सरकारी अभियोक्ता :- श्री. एम. डी. करे

बचाव तथा आरोपी पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ :- श्री. ए.एस. व्यवहारे

## न्यायनिर्णय

(दिनांक १७ जुलै, २०२६ ला घोषित)

१. सदरची केस आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान ३०४(अ), २७९, ३३७, ३३८ व ४२७ तसेच मोटार वाहन अधिनियमाचे कलम १८४,१३४/१७७ अन्वयेच्या गुन्हयासाठी न्यायचौकशीस आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे -**

२. दिनांक ०५/०७/२०१६ रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास मौजे शेटफळ हवेली, ता. इंदापूर, जि. पुणे येथील शेटफळहवेली गावचे हद्दीत, फिर्यादी मोटारसायकलवरुन शेटफळ हवेली ते इंदापूर येत असताना निमगावकेतकी ते शेटफळपाटी रोडवर दोशी चौकात हिरोहोंडा सी.डी.डॉन मोटारसायकल क्र.एम.एच.१२-बी.झेड२६५७ ही रस्त्यावर कडेला थांबवुन अतुल चव्हाण, छायाबाई बाळासाहेब चव्हाण नात शिवांजली हिला कडेवर घेवुन व अनिल सोपान जगताप असे बोलत थांबलले होते. त्यावेळी आरोपी मातीने भरलेला ट्रॅक्टर एम.एच.२५,६२६३ व त्याचे पाठीमागे ट्रॉली नं.एम.एच.४२-ए-८७९२ त्याचा ट्रॅक्टरवरील ताबा सुटून अचानक ब्रेक मारल्याने ट्रॅक्टर रोडचे उजवे बाजुला पलटी होवुन

रस्त्याचे कडेला बोलत उभे असलेले छाया चव्हाण,अनिल जगताप व अतुल चव्हाण व त्यांची मुलगी शिवांजली यांचे अंगावर जावुन मुलगी शिवांजली जागीच मयत झाली. अतुल चव्हाण यांना किरकोळ मार लागला. छाया चव्हाण यांचे उजवे पायाचे मांडीला, उजवे हाताला मार लागुन हाड फ्रॅक्चर झाले. अनिल जगताप यांचे पायाला मार लागुन फ्रॅक्चर झाले. म्हणून फिर्याद दिली.

३. खबरीच्या आधारे इंदापूर पोलीस स्टेशन येथे अपराध क्र. ३१६/२०१६ नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासीक अंमलदार पो.हवा.७२२ श्री.ए.बी.खोमणे यांनी प्रकरणाचा पुढील तपास पूर्ण करीत आरोपी विरुध्द अंतिम अहवाल या न्यायालयासमोर सादर केला.

४. निशाणी क्र.०८ वर आरोपीविरूध्द विवरणपत्र ठेवला व आरोपीस समजावून सांगितला असता त्याने निशाणी क्र.०८ वरील निवेदनान्वये गुन्हा नाकबूल करून केस चालविण्याची विनंती केली.

५. संपरिक्षेदरम्यान, अभियोग पक्षाने वरील नमूद एकूण ०४ साक्षीदारांचा तोंडी पुरावा या न्यायालयासमोर सादर केला. अभियोग पक्षाच्या पुराव्यांती आरोपीचे स्पष्टीकरणात्मक फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. त्यानंतर संपरिक्षेच्या शेवटच्या टप्प्यांत मी सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एम. डी. करे यांचा युक्तिवाद ऐकला आणि बचाव पक्षातर्फे आरोपीचे सुविद्य विधीज्ञ श्री. ए.एस.व्यवहारे यांचा युक्तिवाद ऐकला.

७. या संपूर्ण पार्श्वभुमीवर, माझे समोर निर्णयाकरिता पुढील विचाराधीन प्रश्न उदभवलेत. या प्रश्नांना मी, त्याखालील नमुद कारणमीमांसेच्या बळावर तसेच अभिलेखी उपलब्ध पुराव्याचे आधारे, आज रोजी माझे निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

| अ. क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | दिनांक ०५/०७/२०१६ रोजी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास मौजे शेटफळ हवेली, ता. इंदापूर, जि. पुणे येथील निमगांव केतकी ते शेटफळपाटी रोडवरील दोशी चौकात सार्वजनिक ठिकाणी तुमच्या ताब्यातील मातीने भरलेला ट्रॅक्टर क्र. | **नाही** |

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | एम.एच.२५–एच.६२३६ व त्याचेपाठीमागे जोडलेले ट्रॉली क्र. एम.एच.४२–९.८७९२ व एम.एच.४२–९.८७२९ ही रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणाने मानवी जीवाला धोका होईल किंवा हानी पोहचेल किंवा जखम होण्याची शक्यता होईल असे चालवित असतांना रोडच्या कडेला साक्षीदार नामे अतुल बाळासाहेब चव्हाण हा त्याची हिरोहोंडा कंपनीची सी.डी. डॉन मोटारसायकल क्र. एम.एच.१२–बी.झेड. २६५७ ही रस्त्याच्या कडेला थांबवून त्याची आई छाया बाळासाहेब चव्हाण, मुलगी शिवांजली यांचेसह मामा अनिल सोपान जगताप यांच्याशी गप्पा मारीत उभा असतांना तुम्ही आरोपीने तुमच्या ताब्यातील सदर ट्रॅक्टरचा अचानकपणे ब्रेक दाबल्याने सदरचा ट्रॅक्टर रोडच्या उजव्या बाजुला पलटी होवून रस्त्याचे कडेला सदर उभे असलेले साक्षीदार यांना ट्रॅक्टरचा जोरात ठोस बसवून अपघात घडविले सदर अपघतामध्ये साक्षीदार अतुल यांची मोटारसायकल बाजुच्या चारीत जावून पडली व साक्षीदार अतुल चव्हाण यांना किरकोळ मार लागला, त्याची आई छाया चव्हाण यांच्या उजव्या पायाचे मांडीला व उजव्या हाताला मार लागून हाड फ्रेंक्चर झाले. अनिल जगता यांचे पायाला मार लागून फॅक्चर झाले. तसेच मुलगी शिवांजली ही जागीच मयत झाली. सदर अपघातामध्ये सदर साक्षीदार यांना किरकोळ व गंभीर दुखापती होण्यास तसेच तसेच मुलगी शिवांजली हिला सुध्दा किरकोळ व गंभीर दुखापती होवून तिच्या मृत्यूस कारणीभूत झालात तसेच सदर मोटारसायकलीचे अंदाजे रकम रु. ५०/– पेक्षा अधिक रकमेचे नुकसान होण्यास व अपघातास कारणीभूत झालात. सदर वाहन भरवेगात व जनसामान्याच्या जिवीतास धोका होईल अशा परिस्थीतीत चालवित असतांना आढळून आलात, तसेच जखमीस वैद्यकीय सेवा न पुरविली नाही तसेच जवळच्या पोलीस ठाण्यास घटनेची खबर न देताच घटनास्थळावरुन निघुन गेलात, म्हणून तुम्ही भा.द.वि. चे कलम २७९, ३३७. ३३८, ३०४(अ) व ४२७ तसेच मोटर वाहन कायदा कलम १८४ व १३४/१७७अन्वये माझ्या दखल क्षेत्रात गुन्हा केला. हे अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय ? | |

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| २) | काय आदेश? | **आरोपी दोषमुक्त** |

## <u>!! का र ण मी मां सा !!</u>

८. संपरिक्षेदरम्यान, अभियोग पक्षाने वरील नमूद केल्याप्रमाणे ०४ साक्षीदारांचा तोंडी पुरावा या न्यायालयासमोर सादर केला. तथापी आरोपी व फिर्यादी यांच्यात कोर्टाबाहेर आपसात तडजोड झाल्यामुळे फिर्यादी व आरोपीतर्फे सदर प्रकरण तडजोड करुन काढुन टाकण्याचा संयुक्त अर्ज नि.क्र.१४ वर दाखल करण्यात आला. परंतु सदर प्रकरण तडजोडपात्र नसल्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्यात आला. त्याउलट आरोपीतर्फे कुठलाही शाब्दीक व कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आला नाही.

**<u>मुद्दा क्रमांक १ बाबत:</u>**

९. सदरील मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्याने ते मुद्दे चर्चेकरीता एकत्रीत घेण्यात येत आहे. साक्षीदार क्र.१ ते ४ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, ते न्यायालयात हजर असलेल्या आरोपीस ओळखत नाहीत. घटन सन २०1६ सालची असल्यामुळे त्यांना घटनेबाबत काही आठवत नाही. सदर फिर्यादीस त्याचे फिर्यादमधील व साक्षीदारांस त्यांच्या जबाबामधील अधोरेखांकित भाग–अ हा वाचून दाखविले असता त्यामधील मजकूराबाबत अनभिज्ञता दाखविली.

१०. सदर प्रकरणातील पटलावर आलेल्या पुराव्याचे विवेचन करण्यापुर्वी हे नमुद करणे आवश्यक आहे की, सदर प्रकरणात अभियोगपक्षाने न्यायालयात तपासलेले एकुण ०४ साक्षीदारांपैकी साक्षीदार क्र.१ ते ३ हे एकमेकांचे ओळखीचे आहेत. साक्षीदार क्र.१ हा नेत्र साक्षीदार आहे. साक्षीदार क्र.२ ते ४ हे घटनेतील जखमी साक्षीदार आहेत. परंतु सदर साक्षीदार क्र.१ ते ४ यांनी अभियोगपक्षास सहाय्य होईल अशी साक्ष दिली नाही व त्यांच्या पुराव्यातुन आरोपीविरुद्ध कोणतेही गुन्हे केल्याचे पटलावर आलेले नाही. तथापि, साक्षीदार क्र.४ यांनी सरतपासात असे कथन केले की, घटनेच्या दिवशी तो त्याची आई व मुलगी शिवांजली गाडीवरुन जात असताना अचानक गाडी स्लीप होवुन थांबलेल्या ट्रॅक्टरला त्यांची गाडीची धडक होवुन अपघात झाला व सदर अपघातामध्ये शिवांजली ही दगडावर पडुन मयत झाली.

तसेच साक्षीदार क्र.१ हा फिर्यादी असून औपचारीक साक्षीदार आहे.

११. साक्षीदार क्र.१ ते ४ हे अभियोग पक्षास फितुर झाल्यामुळे आरोपी सिध्दोष होईल इतका सबळ पुरावा अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे आरोपीविरूद्ध दोषारोपीत करण्यात आलेले गुन्हे, की, घटनेच्या वेळेस घटनेच्या वेळेस सार्वजनिक रस्त्यावर आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर एम.एच.२५,६२६३ व त्याचे पाठीमागील ट्रॉली नं.एम.एच.४२–ए–८७९२ ही रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणाने मानवी जीवाला धोका होईल किंवा हानी पोहचेल किंवा जखम होण्याची शक्यता होईल असे चालवुन ट्रॅक्टरवरील ताबा सुटून अचानक ब्रेक मारल्याने ट्रॅक्टर रोडचे उजवे बाजुला पलटी होवुन हिरोहोंडा सी.डी.डॉन मोटारसायकल क्र.एम.एच.१२–बी.झेड२६५७ ही रस्त्याच्या कडेला थांबवुन बोलत बसलेले अतुल चव्हाण, छायाबाई बाळासाहेब चव्हाण, मुलगी शिवांजली व अनिल सोपान जगताप यांचे अंगावर जावुन मुलगी शिवांजली च्या मृत्युस कारणीभुत झाला, अतुल चव्हाण यांना किरकोळ मार लागण्यास, छाया चव्हाण यांचे उजवे पायाचे मांडीला, उजवे हाताला मार लागुन हाड फ्रॅक्चर होण्यास व अनिल जगताप यांचे पायाला मार लागुन फ्रॅक्चर होण्यास कारणीभुत झाला व मोटारसायकल क्र.एम.एच.१२–बी.झेड२६५७ हिस ठोस देवून सदर वाहनाचे रक्कम रु. ५०/–च्या अधिक रक्कमेचे नुकसान होण्यास कारणीभुत ठरला, हे गुन्हे सिद्ध करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ बाबतः–</u>**

१२. वरील चर्चेवरून असे स्पष्ट होते की, एकतर फिर्यादी व इतर साक्षीदारांनी आपल्या साक्षीमध्ये जे सांगीतले ते कथन खोटे आहे किंवा त्यांनी पोलीसांसमक्ष दिलेला जबाब खोटा आहे. सामान्य परिस्थीती मध्ये साक्षीदारांनी असे केल्यावर त्यांच्यावर कोर्टात खोटी साक्ष देण्याच्या गुन्ह्यासाठी कार्यवाही झाली असती परंतु, निशाणी क्र.१५ वर तडजोड पुरसीस देखील दाखल करण्यात आली व त्यात फिर्यादी व साक्षीदारांनी मान्य केले आहे की आरोपीं व त्यांच्यामध्ये कोर्टाबाहेर आपसात तडजोड झालेली आहे व त्यामुळे त्यांची आरोपीविरूध्द कोणतीही तक्रार नाही. सबब, मी फिर्यादी व साक्षीदारांना खोटी साक्ष देण्याचे गुन्हयासाठी जबाबदार धरत नाही. अशाप्रकारे, आरोपी सदर गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब मुददा क्रमांक २ करिता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>– आ दे श –</u>

१. आरोपी शामराव बापूराव दगडे यास फौजदारी प्रक्रिया संहिताच्या कलम २५५(१) प्रमाणे भारतीय दंड विधानाचे कलम ३०४(अ),२७९, ३३७, ३३८ व ४२७ तसेच मोटार वाहन अधिनियमाचे कलम १८४, १३४/१७७ अन्वये दंडनीय अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अन्वये पुर्तता करणेकामी त्याचे स्वबंधपत्र रूपये १५,०००/– रुपये इतके दिले.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI
Date: 2026.07.17 17:06:13 +0530

(**एम. एच. फारुकी**)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
इंदापूर, जि. पुणे.

दिनांक: १७/०७/२०२६

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | Smt. P. D. Kadam (Stenographer-3) |
| Court Name | :- | Shri. M.H. Farooqui,<br>$2^{nd}$ Jt. Civil Judge (Jr. Dn.) and J.M.F.C., Indapur, Dist. Pune. |
| Date | :- | 17/07/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 17/07/2026 |
| Order uploaded on | :- | 17/07/2026 |